

नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित नाशिक रनमध्ये सहभागी झालेले नागरिक.

# सामाजिक बांधिलकीसाठी धावले नाशिककर

## मॅरेथॉन विजेत्यांचा सत्कार । पारितोषिकांची लयलूट

लोकमत न्यूज नेटवर्क

सातपूर : सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने समाजातील गरजू घटकांना मदत व्हावी म्हणून नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित अठराव्या नाशिक रनमध्ये शनिवारी हजारो नाशिककर सुदृढ आरोग्याचा मूलमंत्र देत धावले. यंदा प्रथमच आयोजित दहा किलोमीटर नाशिक रन मॅरेथॉनमध्ये सुमारे २५० जणांनी सहभाग नोंदविला.

महात्मानगर येथील मैदानावर सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास क्रीडापटूंच्या हस्ते ज्योत प्रज्वलित करून आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हवेत फुगे सोडून नाशिक रनची सुरुवात करण्यात आली. महात्मानगर क्रीडांगण ते पारिजातनगर, जेहान सर्कल, नंदन स्वीट्समार्गे महात्मानगर क्रीडांगणावर रनचा समारोप करण्यात आला. यावेळी पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्यासह पंधरा हजारांहून अधिक नाशिककर सुदृढ आरोग्याचा मूलमंत्र देत धावले. प्रमुख पाहुणे म्हणून महापौर सतीश कुलकर्णी, बॉश इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, सहसंचालक एस. सी. श्रीनिवासन, पॉवर ट्रेन बॉशचे विभागीय अध्यक्ष जॉन ओलिव्हर, जर्क बरन्ड, कर्स्टन म्युलर, संदीप नालामंगला, टीडीके इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक एन. बालाकृष्णन, नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, रमेश जी. आर., अनिल दैठणकार, राजाराम कासार, प्रबल रे, अनंथरामन, अशोक पाटील, श्रीकांत चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी आयर्नमॅन किशोर घुमरे, महेंद्र छोरिया, प्रशांत डबरी, डॉ. अरुण गचाले यांच्यासह सर्व आयर्नमॅनचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

### मॅरेथॉनमधील विजेते स्पर्धक

**महिला गटात** - १० किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेत १५ ते ३५ वयोगट वर्गात प्रथम- योगीता वाघ, द्वितीय- दिशा बोरसे, तृतीय- निवृत्ता धवड; ३६ ते ५० वयोगटात प्रथम- अश्विनी देवरे, द्वितीय- नितू सिंग, तृतीय- नीता नारंग; खुल्या वयोगटात प्रथम- सुचिता पालवे, द्वितीय- कल्पना कुशारे, तृतीय- रेवती चिटको.

**पुरुष गटात** - १५ ते ३५ वयोगटात प्रथम- रोहित यादव, द्वितीय- सुनीत कुमार, तृतीय- रवी कुमार; ३६ ते ५० वयोगटात प्रथम- सावळीराम शिंदे, द्वितीय- संतोष वाघ, तृतीय- नंदू उगले; खुल्या गटात प्रथम- हरीश चंद्र, द्वितीय- वसंतराव कचरू, तृतीय- दिनकर शेळके यांनी पटकाविला.

**नाशिक रन** - २०२० रेस ॲम्बेसेडर्स - डॉ. महेंद्र महाजन, डॉ. हितेंद्र महाजन, एव्हरेस्टवीर, रॅम विजेते, अनिरुद्ध अथणी- अल्ट्रा रनर, नारायण वाघ- अल्ट्रा रनर, महेंद्र छोरिया, प्रशांत डबरी, डॉ. अरुण गचाले, किशोर घुमरे- आयर्नमॅन, अश्विनी देवरे- मॅरेथॉन चॅम्पियन रनर, डॉ. मनीषा रौंदळ- सायकल क्वीन.

Scanned by CamScanner